प्रयोग करूं पहाणाऱ्या व्यक्तींना/संस्थांना उत्तेजन देऊन, थिएटरची उपलब्धता व्यवसायाशीं जोडली पाहिजे. नाट्यव्यवसायाशीं संबंधित असलेल्या व्यक्ती आणि संस्थानाच थिएटर उपलब्ध करून घेण्याचा अधिकार असावा. राजकीय बैठकीसाठी थिएटर काढून घेण्याचे प्रकार बंद व्हायलाच हवेत.

४) बाहेरगांवी रात्री प्रयोगानंतर जेवण मिळणे कठीण जातें. त्यासाठीं प्रत्येक थिएटरमध्यें ते उपलब्ध असायलाच हवें. प्रयोग संख्या कमी म्हणजे मोजकीच असेल तर उपहारगृह जिवंत ठेवणे कठीण आहे. अशा वेळी थिएटरजवळ असलेल्या हॉटेलचा परवाना देताना थिएटरमध्यें नाटकाच्या वेळी खाण्याचे पदार्थ, जेवण व चहा उपलब्ध करून देण्याची अट घातली पाहिजे. या गोष्टींची अमंलबजावणी होण्यासाठीं त्या त्या गावातील सरकारी अधिकाऱ्यांनी जबाबदारी उचलण्याची आवश्यकता आहे.

५) तिकिट दर परवडणारे असावेत असें मला वाटतें. पहिला दर ५०० रुपये असतो. सामान्य प्रेक्षकाला तो परवडत नसावा. त्यासाठीं खर्चात कपात कशी करतां येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. निर्माता संघटनेचे प्रतिनिधी, बाहेरगावचे व्यवस्थापन करणारे यांची याबाबतीत काय मते आहेत ते जाणायला हवें. याचा संबंध रहाणे, जेवण, प्रवास याचेशीं येतो. एकूणच याचा उहापोह गांभीर्याने, म्हणजे अडचण सोडवायचीच या निर्धाराने व्हायला हवा.

६) नाट्यगृहाचें भाडे मर्यादित असावें. प्रत्येक ठिकाणी किमान २५ प्रवेशिका पहिल्या दराच्या विनामूल्य द्याव्या लागतात, म्हणजे मूळ भाडें अधिक २५ प्रवेशिकांची किंमत साधारण रू. १२५०० एवढे द्यावे लागतात. यावर बंधन कोण आणणार आणि वैर कोण पत्करणार ? एकेकाळी मुंबईत जाहिरात दिली की सगळ्या महाराष्ट्रात जात असे. आता दहा ठिकाणाहून प्रसिद्ध होणारी वर्तमानपत्रे त्या त्या विभागात वेगळा चार्ज घेतात. अनेक स्पर्धांवर व सन्मान पार्ट्यांवर आणि त्याच्या जाहिरातीवर खर्च करून स्वत:च्या वर्तमानपत्राचा खप वाढवण्याकडेच कल असतो. ते



तर करायलाच हवे व आवश्यक आहे. नाटकांच्या जाहिरातीसाठींही तसाच दृष्टीकोन ठेवून व्यवसायाला मदत करावी. मुंबई पुण्यात काय चालले आहे. कोणत्या नाटकाचे मुहूर्त झाले, पहिला प्रयोग जाहीर कधी झाला इत्यादी गोष्टी बाहेरगावी कळतच नाहीत. परिणाम व्यवसायावर होतो.

७) अभिनयाचे क्षेत्र आता खूप विस्तारीत झाले आहे. सहाजिकच अनेक तरुण तरुणी या क्षेत्रांत येण्यास उत्सुक असतात. त्यामुळे अभिनय या विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात व्हायला हवा. चित्रकला, गायन, कवायत असे विषय असतात. पहिलीपासून व्यक्तिमत्व विकास ज्यामध्ये वक्तृत्व, अभिनय अशी अनेक अंगे येतात यांचा दर आठवड्याला दोन तास असा अभ्यासक्रमात समावेश व्हावा. दहावीनंतर ऐच्छिक विषय ठेवून विद्यार्थ्याला, कला, शास्त्र, अर्थ याप्रमाणे व्यक्तिमत्व विकासाचा अभ्यासक्रम करता येईल.

८) नाट्यगृहाच्या स्थितीबद्दल आज सर्वत्र खूपच आरडा–ओरड चाललेली दिसते. सरकारने व नगरपालिकांनी त्यांच्या ताब्यातील सर्व नाट्यगृहे परिषदेच्या ताब्यात द्यावीत व परिषदेने सर्व नाट्यगृहांची देखभाल करावी. यासाठी येणारा खर्च सरकार व नगरपालिकांनी परिषदेला द्यावा. समाजसेवा उपाशीपोटी होत नाही हे समजून, परिषदेनेही पगारी माणसे नेमावीत. राष्ट्रपती, प्रधानमंत्री, मुख्यमंत्री ह्या अधिकाराच्या आणि जनसेवेच्या पदानाही मासिक पगार असतो. परिषदेनेही पैसे देऊनच सेवा घ्यावी. तरच कामे वेळच्या वेळी होतील.

९) चिपळूणचे थिएटर इतकी वर्षे झाली तरी तयार का नाही ? चिपळूणच्या प्रेक्षकाना त्याचे सोयरसुतक नाही. नटांनाही आणि निर्मात्यांनाही नाही. मुंबईचे घाणेकर नाट्यगृहाचे उदाहरण घ्या. आमच्या भागातील नाट्यगृह अजून का तयार नाही हा प्रश्न जोपर्यंत प्रेक्षकांना पडत नाही, तोपर्यंत काहीही होणार नाही. यावर उपाय योजणे आवश्यक आहे.

९६ व्या नाट्यसम्मेलनाध्यक्षांनी प्रवासाच्या खर्चाबद्दल सूतोवाच केलें आहे. त्याला अनुसरून मीही असेच म्हणेन की स्वातंत्र्यसैनिक, आमदार,